नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर शासन सेवेत पुनर्नियुक्ती देण्याबाबत.

---

**महाराष्ट्र शासन,**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: आरईएम-1595/प्र.क्र.48/95/13,

मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 9 नोव्हेंबर, 1995.

वाचा :- (1) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: पीएससी-1071/1855/डी, दिनांक 10 ऑगस्ट, 1971.

(2) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1073/डी-2, दिनांक 30 जुलै, 1973.

(3) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1086/553/13, दिनांक 25 जून, 1986.

(4) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1087/70/87/13, दिनांक 1 ऑक्टोबर, 1987.

(5) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1089/प्र.क्र.2/89/13, दिनांक 9 फेब्रुवारी, 1989.

(6) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1593/प्र.क्र.75/93/13, दिनांक 22 डिसेंबर, 1993.

(7) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1594/467/13, दिनांक 3 सप्टेंबर, 1994.

(8) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1994/467/13, दिनांक 8 फेब्रुवारी, 1995.

**शासन निर्णय :-** सेवानिवृत्त होणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केवळ अतिशय अपवादात्मक परिस्थितीत व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पुनर्नियुक्ती देण्याबाबत वेळोवेळी सूचना देऊनही सेवानिवृत्त होणारे अधिकारी/कर्मचारी यांना पुनर्नियुक्ती देण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा प्रकारे पुनर्नियुक्ती दिल्यामुळे पदोन्नतीस पात्र अधिका-यांना/कर्मचा-यांना योग्य वेळी पदोन्नती न मिळाल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो व वैफल्याची भावना निर्माण होते. तसेच काही कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहतात आणि पदोन्नती/सरळसेवेने भरावयाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. याबाबत शासनाकडे अनेक निवेदने आल्यामुळे सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पुनर्नियुक्ती देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती विहित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. यासंबंधात यापूर्वी वेळोवेळी जे आदेश निर्गमित केलेले आहेत ते अधिक्रमित करून शासनाच्या ध्येय धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने आता याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

(1) नियत वयोमानानंतर (वयाची 58/60 वर्षे) सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांचे सेवेत पुनर्नियुक्ती/सेवेत वाढ मिळण्याबाबतचे अर्ज विचारात घेऊ नयेत.

(2) अतिशय अपवादात्मक परिस्थितीत व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पुनर्नियुक्ती (सेवेत वाढ नाहीच) द्यावयाची झाल्यास पुढील अटींची पूर्तता होत असल्याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी:-

(अ) ज्या पदावर पुनर्नियुक्ती द्यावयाची आहे, ते पद रिक्त होण्यापूर्वी किमान 6 महिने आधी प्रयत्न करूनही पदोन्नती किंवा बदलीद्वारे योग्य कर्मचारी उपलब्ध होऊ शकले नाहीत, नामनिर्देशनाद्वारे हे पद भरावयाचे असल्यास आयोगाकडे असे पद रिक्त होण्यापूर्वी 6 महिने आधी मागणीपत्र पाठविले असणे आवश्यक आहे.

(ब) संबंधित पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी कोणीही कर्मचारी उपलब्ध नाही किंवा संबंधित विभागामधून/कार्यालयामधून तात्पुरती पदोन्नती देऊन एखाद्या कर्मचा-याची नियुक्ती करणे शक्य नाही.

(क) सदर पद केवळ विशिष्ट कालावधीसाठीच ( Tenure Post ) असून सदर पद, पुनर्नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येणार आहे.

(ड) ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यास पुनर्नियुक्ती द्यावयाची आहे, त्याच्याजवळ त्या पदासाठी आवश्यक असणारी विशेष शैक्षणिक अर्हता (प्रामुख्याने तांत्रिक अर्हता) व सखोल अनुभव आहे आणि अशी अर्हता व अनुभव सेवेत असणा-या इतर कर्मचा-यांकडे नाही.

(इ) पुनर्नियुक्ती ही सार्वजनिक हिताच्या दृष्टीनेच करण्यात येत आहे.

(3) वरील अटींची पुर्तता होत असल्याचे सिध्द झाल्यानंतरच संबंधित प्रस्तावास सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची मान्यता घेऊन संबंधित प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी मा. मुख्य मंत्र्यांना संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांमार्फत सादर करण्यात यावा. तसे करताना यासोबतच्या परिशिष्टात विहित केलेले प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

(4) विहित कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन न करता शासनाकडे प्रस्ताव सादर करणा-या अधिका-यावर त्याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

(5) रु.3700-5000 किंवा त्याहून अधिक वेतनश्रेणीतील अधिका-यांच्या पुनर्नियुक्तीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग यांनी पाहिल्यानंतर मा. मुख्य मंत्र्यांकडे सादर करताना ते मुख्य सचिवांमार्फत सादर करण्यात यावेत.

(6) वरील आदेश सर्व गटांतील कर्मचा-यांना लागू होतील. तसेच शासनाचे विविध उपक्रम, महामंडळे, निमशासकीय व संविधानिक संस्था यांना देखील लागू होतील.

3. मंत्रालयाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी शासनाचे वरील सर्वसाधारण व धोरणात्मक आदेश त्या त्या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच संविधानिक संस्था, महामंडळे व इतर सार्वजनिक उपक्रम यांच्या निदर्शनास आणून वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना त्वरित द्याव्यात व त्यांचे काटेकोरपणे अनुपालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के. सी. श्रीवास्तव,
शासनाचे प्रधान सचिव.

एच-1207(3000-11-95)-1अ

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव
मुख्य मंत्री यांचे सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव,
* प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, विधान भवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, विधान भवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.

---

* पत्राने.

---

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः आरईएम-1595/प्र.क्र.48/95/13, दिनांक 9 नोव्हेंबर, 1995 सोबतचे परिशिष्ट)

......

## प रि शि ष्ट

## प्र मा ण प त्र

मी, श्री./श्रीमती

(विभाग/कार्यालय प्रमुखाचे नाव)

असे प्रमाणित करीत आहे की, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः आरईएम-1595/प्र.क्र.48/95/13, दिनांक 9 नोव्हेंबर, 1995 च्या आदेशामध्ये विहित केलेल्या निकषांची सदर प्रकरणी पूर्णतः परिपूर्तता होत आहे. त्यात जर काही त्रुटी राहून हा प्रस्ताव केला गेल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझ्यावर राहील.

विभाग/कार्यालय प्रमुख.

---

एच-1207(3000-11-95)-2